# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना** :- परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) योजने अंतर्गत
**{ लेखा व वित्त विभाग }** महानगरपालीकेचे अंशदान १० टक्क्यावरुन १४ टक्के करण्याबाबत तसेच सर्व संबंधीत कर्मचा-यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेत वर्ग करण्याबाबतचा ठराव पारीत करण्याबाबत.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने नागपूर महानगरपालीकेने ठराव क्र. ३३, दिनांक ०३/०२/२०१० नुसार महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. अनियो/१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५ मधील निर्णयानुसार महानगरपालीकेच्या सेवेत दिनांक ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नविन नियमित नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन म.न.पा कर्मचा-यांना लागू करण्याबाबत ठराव झालेला असून सदर ठराव मा. आयुक्तांनी दिनांक १३/०३/२०१० रोजी कार्यन्वीत केल्याने ही योजना वित्त विभागाचे परिपत्रक क्र. १५६/प्रलेविअ, दिनांक २२/०९/२०१० नुसार म.न.पा कर्मचा-यांना लागु करण्यात आलेला आहे. त्यानुसार कर्मचा-यांचे अंशदान १० टक्के व महानगरपालीकेचे अंशदान १० टक्के कर्मचा-यांचे DCPS खात्यात जमा करण्यात येत आहे.

शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो-२०१९/प्र.क्र.२६६/सेवा-४, दिनांक १९ ऑगष्ट २०१९ नुसार व केंद्र शासनाचे अधिसुचना क्रमांक फा.सं१/३/२०१६-पीआर, दिनांक ३१/०१/२०१९ नुसार परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS)/राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना अंतर्गत (शासनाच्या अंशदानात) नियोक्त्याचे अंशदान, वर्गणीदार कर्मचा-याच्या वेतन आणि महागाई भत्त्याच्या १४ टक्के करण्यात आलेले आहे.

शासन निर्णय नगर विकास विभाग क्रमांक. संकिर्ण-२०२१/प्र.क्र.११९/नवि-२०, दिनांक २२ फेब्रुवारी २०२२ अन्वये महानगरपालीकेतील कार्यरत अधिकारी/कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागु करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर योजना लागु करण्यापूर्वी शासन निर्णयानुसार नियोत्त्यांचे अंशदान १४ टक्के जमा करुन एकत्रीत रक्कम राष्ट्रीय निवृत्ती वेतनात वर्ग करण्याची कार्यवाही करता येईल यास्तव सदर विषयी मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे कडे सदर विषयाची नस्ती मान्यतेकरीता सादर केली असता त्यांनी DCPS मधील कर्मचा-यांना NPS राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजने मध्ये वर्ग करण्यास मान्यता दिलेली असुन नागपूर महानगरपालीकेचे अंशदान १४ टक्के दिनांक ०१/०४/२०२५ पासून करण्यास मान्यता दिलेली असल्याने सदरचा विषय म.न.पा. सभागृहासमोर ठेवावा लागेल परंतु सध्या म.न.पा. सभागृह अस्तित्वात नसल्यामुळे मा. प्रशासक यांचे मंजूरीकरीता सादर करण्यात येत आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 82/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 06/12/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२

अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार प्रमुख लेखा व वित्त अधिकारी, लेखा व वित्त विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) योजने अंतर्गत महानगरपालीकेचे अंशदान १० टक्क्यावरुन १४ टक्के करण्याबाबत तसेच सर्व संबंधीत कर्मचा-यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेत वर्ग करण्याबाबतचा ठराव पारीत करण्याबाबत.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने नागपूर महानगरपालीकेने ठराव क्र. ३३, दिनांक ०३/०२/२०१० नुसार महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. अनियो/१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५ मधील निर्णयानुसार महानगरपालीकेच्या सेवेत दिनांक ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नविन नियमित नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन म.न.पा कर्मचा-यांना लागू करण्याबाबत ठराव झालेला असून सदर ठराव मा. आयुक्तांनी दिनांक १३/०३/२०१० रोजी कार्यन्वीत केल्याने ही योजना वित्त विभागाचे परिपत्रक क्र. १५६/प्रलेविअ, दिनांक २२/०९/२०१० नुसार म.न.पा कर्मचा-यांना लागु करण्यात आलेला आहे. त्यानुसार कर्मचा-यांचे अंशदान १० टक्के व महानगरपालीकेचे अंशदान १० टक्के कर्मचा-यांचे DCPS खात्यात जमा करण्यात येत आहे.

शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो-२०१९/प्र.क्र.२६६/सेवा-४, दिनांक १९ ऑगष्ट २०१९ नुसार व केंद्र शासनाचे अधिसुचना क्रमांक फा.सं१/३/२०१६-पीआर, दिनांक ३१/०१/२०१९ नुसार परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS)/राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना अंतर्गत (शासनाच्या अंशदानात) नियोक्त्याचे अंशदान, वर्गणीदार कर्मचा-याच्या वेतन आणि महागाई भत्त्याच्या १४ टक्के करण्यात आलेले आहे.

शासन निर्णय नगर विकास विभाग क्रमांक. संकिर्ण-२०२१/प्र.क्र.११९/नवि-२०, दिनांक २२ फेब्रुवारी २०२२ अन्वये महानगरपालीकेतील कार्यरत अधिकारी/कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागु करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर योजना लागु करण्यापूर्वी शासन निर्णयानुसार नियोत्त्यांचे अंशदान १४ टक्के जमा करुन एकत्रीत रक्कम राष्ट्रीय निवृत्ती वेतनात वर्ग करण्याची कार्यवाही करता येईल यास्तव सदर विषयी मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे कडे सदर विषयाची नस्ती मान्यतेकरीता सादर केली असता त्यांनी DCPS मधील कर्मचा-यांना NPS राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजने मध्ये वर्ग करण्यास मान्यता दिलेली असुन नागपूर महानगरपालीकेचे अंशदान १४ टक्के दिनांक ०१/०४/२०२५ पासून करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.